# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.02.2026** **वार- मंगळवार**

---

**शिक्षणमंत्री**

राज्य शासनाच्या विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी सर्व शाळांमध्ये प्रमुख पाच ते सहा योजनांची ठळक माहिती देणारे फलक प्रदर्शित केले जावेत, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजनांबाबतच्या आढावा बैठकीत ते आज बोलत होते. प्रमुख योजनांची माहिती ठळक स्वरूपात तीन बाय चार आकाराच्या फलकाद्वारे प्रत्येक शाळेमध्ये दर्शनी जागी लावावी असं त्यांनी सांगितलं.

**महाआरोग्य सन्मान**

महाआरोग्य सन्मान 2026 अंतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आषाढी वारीदरम्यान, भक्ती विठ्ठलाची सेवा आरोग्याची या ध्येयवाक्याअंतर्गत वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवेचं प्रभावी नियोजन आणि नियंत्रण केल्याबद्दलही पुणे जिल्हा आरोग्य विभागाचा विशेष गौरव करण्यात आला. मुंबईत झालेल्या सोहळ्यात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी हा सन्मान स्वीकारला.

**परिवहनकार्ड**

राज्य परिवहन महामंडळाची महिला आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या तिकीट दर सवलतीसाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य करण्यात आलं आहे. कार्ड नसल्यास प्रवाशांना पूर्ण तिकीट दर द्यावा लागेल. त्यामुळे प्रवाशांनी तातडीनं हे कार्ड काढून घ्यावं असं आवाहन पुणे, बारामती आगार प्रमुख रविराज घोगरे यांनी केलं आहे.

**स्वीकृत नगरसेवक**

पिंपरी चिंचवड महापालिकेत भारतीय जनता पक्षातर्फे स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या नवीन नियमानुसार 12 नगरसेवकांच्या मागे एक स्वीकृत नगरसेवक याप्रमाणे विभागणी करण्यात आली आहे. महापालिकेत भाजपाचे 84 नगरसेवक असून सात नवीन जागांवर स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती करण्यात येईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला तीन स्वीकृत नगरसेवक पदं मिळणार आहेत.

**रामनकॉन्फरन्स**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे ३२ वी रामन स्मृती परिषद आयोजित करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली ही राष्ट्रीय स्तरावरील परिषद येत्या गुरुवारी आणि शुक्रवारी होणार आहे. 'श्रॉडिंगर समीकरणाची १०० वर्षे आणि त्याचा कालजयी प्रभाव' ही परिषदेची संकल्पना आहे.
या परिषदेत पदार्थ विज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी, आण्विक भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र अशा अनेक विषयांवर चर्चा आणि सादरीकरण होणार असल्याची माहिती भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. श्रीकृष्ण सरताळे यांनी दिली.

**एआयटी**

लष्करी अधिकारी आणि जवानांच्या पाल्यांसाठी असलेल्या पुण्यातील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात एआयटीला नुकताच स्वायत्ततेचा दर्जा मिळाला आहे. आर्मी वेलफेअर एज्युकेशन सोसायटीच्या देशभरातील १२ महाविद्यालयांपैकी स्वायत्तता मिळवणारं हे पहिलंच महाविद्यालय ठरलं आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग आणि क्वांटम कॉम्प्युटिंग सारखे अद्ययावत अभ्यासक्रम सुरू करण्यावर संस्थेचा भर असेल, अशी माहिती संस्थेचे संचालक निवृत्त मेजर जनरल यु. एस. सेनगुप्ता यांनी दिली.

**सावरकर स्मृतीदिन**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त येत्या गुरुवारी फर्ग्युसन महाविद्यालयात विशेष अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतीगृहातील सावरकरांची खोली सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी खुली ठेवण्यात येणार आहे. तसंच संध्याकाळी ५ वाजता महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या साहित्य आणि जीवनकार्यावर आधारित 'गुण-सुमनें मी वेचियली या भावें' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे.

**बीज सोहळा**

येत्या ३ ते ५ मार्चदरम्यान देहूमध्ये संत तुकाराम महाराज बीज सोहळा होणार आहे. यानिमित्त राज्यभरातून तसंच इतर राज्यांमधूनही मोठ्या संख्येनं भाविक आणि वारकरी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर यात्रा कालावधीत देहू नगरपंचायत हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावर आणि सार्वजनिक जागेत संसर्गजन्य रोग्यांनी येऊ नये. संबंधित क्षेत्रात कोणताही संसर्गजन्य रुग्ण आढळल्यास देहू नगरपंचायतीनं तयार केलेल्या शेडमध्ये राहणं त्यांना बंधनकारक असेल असे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 34 आणि किमान १५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात बदल संभवत नाही. संध्याकाळी आकाश ढगाळ राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**